Lalita Gandbhir

4200 North Ocean Dr.

#1500 - 2

Riviera Beach, FL 33404

U.S.A.

lalitagandbhir@hotmail.com

# त्रिकूट

पुण्यातल्या प्रशस्त दीक्षितांच्या वाड्यात दीक्षित कुटुंब व तीन बिऱ्हाडं होती. त्या तीन बिऱ्हाडांत तीन सुनांनी एकाच उन्हाळ्यात गृहप्रवेश केला. एकमेकींच्या लग्नातच ह्या सुनांची आोळख झाली आणि वाड्यात राहायला येताच त्यांची मैत्री झाली. एका वर्षाने महिन्याच्या अंतराने त्यांनी तीन कन्यारत्नांना जन्म दिला. मोठ्या हौसेने त्यांनी संगनमत करून त्या तिघींनी आपल्या कन्यारत्नांना वेलींची नावं ठेवली. जाई, जुई आणि सायली. त्यातलं एक कन्यारत्न मी! सायली.

दीक्षितांच्या वाड्यातच एकमेकींशी खेळत, एकाच घरी जेवत, पुष्कळदा रात्री एकत्र झोपत आमचं बालपण गेलं. आम्ही तिघी रांगू लागल्यावर वाड्यातल्या लाल मातीने सारवलेल्या मधल्या चौकात आमच्या आया एक मोठी सतरंजी पसरून आम्हाला खेळण्यासाठी मोकळं सोडत. खुळखुळे, बाहुल्या, चेंडू अशी खेळणी सतरंजीवर कायमची ठेवलेली असत. आम्ही तिघी त्या खेळण्यांशी व एकमेकींशी, रांगत, मग उभं रहात, मग धावत खेळत असू. आम्हाला संभाळायला एखादी आजी किंवा आजोबा खुर्चीवर बसलेले असत. लहानपणी ते अंगणच आमचं जग होतं. आम्ही चार वर्षांच्या होताच आमच्या आयांनी आम्हाला एका अर्ध्या दिवसाच्या नर्सरी स्कूलमध्ये घातलं. तिथून पुढे आमचं नाव एकाच शाळेत नोंदवलं. मॅट्रिकपर्यंत आम्ही बरोबरीने शाळेत गेलो. संगतीने होमवर्क केलं. अभ्यास केला. शाळेत मजा केली. दुकानात कपड्यांची, रिबिनींची खरेदी केली. भोंडले

खेळलो.  मंगळागौरी जागवल्या. दिवाळीत फटाके उडवले व किल्ले बांधले. एव्हढंच नव्हे तर आम्हाला संगतीनेच कांजिण्या व गोवर झाल्या.

असं असलं तरी आमच्यात फरक होते. आम्हा तिघींनाही गाण्याच्या क्लासला घातलं. टिकली एकटी जाई. तिचा आवाज गोड व सुरेल होता. तिला नेहमी शाळेत व मग कॉलेजात कार्यक्रमात भाग घ्यायला निवडायचे. जुई उत्तम खेळाडू होती. ती कायम आंतरशालेय सामन्यांत खेळायची. ती भरतकामात व शिवणकामातही प्रवीण होती. तिला त्यात बक्षिसं मिळायची. वर्गात माझा नंबर पहिल्या पाचात यायचा. पण तेव्हढंच. मला त्या दोघींचा हेवा वाटायचा.

शिवाय जाई व जुई गोऱ्या होत्या. माझ्या रंगाकडे बघून माझा काका माझ्या 'सायली' नावाचा 'सावळी' असा अपभ्रंश करायचा. ते मला टोचायचं. जाई गोरी, घारी, नकट्या नाकाची, गोल चेहेऱ्याची आणि बांधेसूद होती. जुईचा चेहेरा उभट, नाक सरळ व डोळे मोट्ठे व काळे होते. माझ्याकडे 'लांब कुरळे केस, उंची आणि मस्त फिगर आहे' असं माझी मावशी म्हणायची. काका 'ते तिचे प्लस पॉइंटस् आहेत' असं म्हणायचा.

माझ्या मनात हेवेदावे असले तरी आमची मैत्री टिकून राहिली. कारण मी माझ्या मनातला हेवाभाव दाबून टाकला. सतत चांगलीच वागले. जाई किंवा जुई ह्यांच्यात एकमेकींविषयी किंवा माझ्याबद्दल हेवा असेल असं माझ्या स्वप्नातही आलं नाही. कारण माझ्या दृष्टीने त्या सर्वगुणसंपन्न होत्या. त्यांना माझा हेवा वाटण्याचं कारणच नव्हतं.

आम्ही सतत बरोबरीने असू म्हणून दीक्षित आजींनी आम्हाला 'त्रिकूट' म्हणायला सुरवात केली. मग सगळेच आम्हाला त्रिकूट म्हणू लागले. उदा. 'त्रिकूट बाजारात गेलंय.' मग माझ्या काकाने 'त्रिकुटाचं तीन भावांशी लग्न करून द्यायला पाहिजे' असा विनोद केला. ह्या विनोदानंतर 'सावळीला कोण पत्करणार?' असा भोचक प्रश्न माझ्या आत्याने विचारला.

आमच्या लहानपणी आमच्या तीन आयांनी त्यांच्या तीन लाडक्या लेकींसाठी पुण्यातलेच जावई निवडायचे असं ठरवलं होतं. आम्ही मोठ्या झाल्यावर त्या दिशेने त्यांनी प्रयत्नही केले.

मॅट्रिकनंतर आम्ही एकाच कॉलेजात गेलो तरी आमचे मार्ग थोडे वेगळे झाले. जाईने बी.ए.ला मराठी घेतलं, जुईने इंग्लिश तर मी गणित. जाई गात राहिली, जुई टेबल टेनिस, बॅडमिंटनचे गेम्स खेळत राहिली तर मी ऐकायचं व प्रेक्षकाचं काम करत राहिले.

आम्ही तिघी सिनियरला होतो तेव्हा जाईला गोडबोल्यांनी मागणी घातली. त्यांचा पुण्यात मोठ्ठा वाडा होता, गावात जमीन व गाईम्हशी होत्या. नवऱ्या मुलाला दोन धाकट्या बहिणी व एक लग्न झालेली मोठी बहीण होती. घरी एक विधवा आत्या व काकू होती. जाईच्या आईला 'आपल्या मुलीवर खूप जबाबदारी पडेल' असं वाटलं म्हणून हे स्थळ नको होतं. पण बाकी सगळ्यांना ते श्रीमंत म्हणून पसंत पडलं. जाईचं लग्न ठरलं. बी.ए.ची परीक्षा झाल्यावरचा मुहूर्त ठरवला.

जाईच्या साखरपुड्याच्या वेळी जाईच्या नवऱ्याच्या एका मित्राने जुईला पाहिलं. आणि त्यांनी आपापसात लग्न ठरवलं. तो पुण्यातलाच पण आर्मीत, म्हणून बदल्या होणारा होता.

दोन आठवड्याच्या अंतराने त्या दोघींच्या लग्नाचे मुहूर्त ठरले.

माझ्यासाठीही स्थळ बघत होते. बी.ए. पास झाल्यावर नकाराचे टक्केटोणपे खात, न येणारं शिवण-भरतकाम करत मी दिवस काढत होते. जाई, जुईच्या मगळागौरी पार पडल्यावर एका स्थळाकडून मला होकार आला. सुभाष माझ्यापेक्षा उजवा होता. इंजिनियर होता. त्याला पुण्यातच नोकरी होती. घरी फक्त आईवडील होते. लग्न झालेली एक मोठी बहीण होती. माझी आई खूष झाली. माझं मत कुणी विचारलंच नाही. मी मत दिलं नाही. लग्न जमलं यातच आनंद मानला.

लग्न ठरल्यावर आम्ही दोघंच फिरायला गेलो तेव्हा "मी सावळी असून तू मला कसं पसंत केलंस?" असा रोखठोक प्रश्न मी सुभाषला विचारला. "सर्वच पुरुषांना गोऱ्या मुली आवडतात हे तुला कुणी सांगितलं?" असं विचारत तो मोठ्याने हसला.

"आयुष्यात प्रथम माझ्या सावळेपणाचा मला आनंद होतोय." मी सांगितलं

माझ्या लग्नानंतर जाई व जुई सतत आमच्या घरी येत राहिल्या म्हणून सुभाषने "ह्या दोन साल्या मला लग्नात आंदण मिळाल्यात." असा विनोद त्या दोघींबद्दल केला.

एका रात्री, "मी अमेरिकेला नोकरीला अर्ज केलाय. मिळाली तर दोघं बरोबरीने जाऊ." असा बॉम्बगोळा माझ्या दिशेने फेकला.

"पुणं सोडायचं?" मी धक्क्यातून सावरत विचारलं.

"दोन वर्षांनी परत येऊ." त्याने आश्वासन दिलं. "जरा अमेरिका युरोप बघू तरी. थोडे पैसेही जमतील."

सुभाषला नोकरी मिळाली आणि मी मुकाट्याने गाशा गुंडाळायचं ठरवलं.

आईच्या डोळ्याचं पाणी थांबेना. पुण्याचा जावई तिच्या लेकीला घेऊन साता समुद्रापलीकडे चालला होता. जाई व जुई दोघी मुलांना कडेवर मारून माझ्या घरी आल्या व सुभाषशी भांडल्या. सुभाष नुसता हसला. त्याचा निर्णय झालेला होता.

आम्ही अमेरिकेला पोचलो. आमचं बस्तान बसलं. ओळखी झाल्या. दिवस उलटत होते. पण घरी पाळणा हलण्याची चिन्हं दिसेनात. सर्व तपासण्या झाल्या. महाप्रयत्नाने जयाचा जन्म झाला. ती तीन पौंडांची होती. तिचा जन्म झाला तेव्हा तिचा व माझा जीव धोक्यात होता. "तिच्या नंतर तुला मुलं होणं कठीण आहे." असं डॉक्टरने सांगितलं. 'जया आमच्यानंतर एकटी पडेल'या विचाराने मला खूप वाईट वाटलं. पण सुभाष म्हणाला,

"हे बघ, आपल्याला एक मूल आहे यात आापण आनंद मानून घेऊ. कित्येक जोडपी मुलंच होऊ देत नाहीत, त्यांना आयुष्यात मजा करायची असते. तशी मजा आपण जया मोठी झाल्यावर करू."

जया एकदम स्वतंत्र वृत्तीची होती. अडीच वर्षांची होईपर्यंत मी तिला संभाळलं. मग अर्ध्या दिवसाच्या नर्सरीत घातलं. तिथे ती एव्हढी रमली की तिच्या टीचरने " दुपारी तिला डे केअरमध्ये पाठव" असं सुचवलं. सबंध दिवस शाळेत घालवूनही पाच वाजता तिला डे केअरमधून घरी येण्याची इच्छा नसे.

आता मी सबंध दिवस एकटीच घरी असायची. 'दुसर मूल होत नाही' म्हणून मला वाईट वाटतच राहिलं. मी उदास झाले. ते सुभाषच्या लक्षात आलं. तो म्हणाला, "हे बघ, तू आता दिवसभर घरी बसलेली असतेस आणि कुढत राहतेस. ते बरं नाही. तू आता घरी राहू नकोस. काही तरी उद्योग कर. माझ्याबरोबर काम करणाऱ्या एका मित्राची बायको इंटिरियर डेकोरेटिंगचे क्लासेस घेणार आहे. तुझंपण त्यात नाव घालतो."

त्याने मला घराबाहेर ढकललं म्हणून मी घराबाहेर पडले. सुभाषच्या मित्राची पत्नी 'हेदर' व मी इंटिरियर डेकोरेटिंगच्या क्लासेसना जाऊ लगलो. तिची व माझी मैत्री झाली. आमचा कोर्स पूर्ण झाल्यावर हेदर म्हणाली, "तू आणि मी मिळून इंटिरियर डेकोरेटिंगचा बिझिनेस सुरू करूया." माझ्यापुढे वेळ कसा घालवायचा हा प्रश्न होताच. मी संमती दिली आणि आमचा बिझिनेस रुटूखुटू करत सुरू झाला.

मी तशी मोकळीच होते. जयाच्या जन्मापूर्वी आणि नंतर तिला घेऊन भारताच्या वाऱ्या करत होते. भारतात गेले की जाई आणि मी दोन दिवस काढून जुईच्या घरी पोचत असू. मग आम्ही तिघीच कुठेतरी दोन दिवस राहायला जायचो. आमच्याबरोबर आर्मीचा एक माणूस येत असे.

आमचं त्रिकूट मग मजा करत असे. शिवाय जाई व जुई, मी आले की दोन दिवस माहेरी परत येत असत. वाड्यातले सगळे 'त्रिकूट जमलं रे जमलं' असं म्हणत. दर भेटीला मी त्यांना "तुम्ही माझ्या घरी अमेरिकेला या"

असं आमंत्रण देत असे. त्या "येतो येतो"असं म्हणत पण प्रत्यक्षात "मुलांची परीक्षा, मुलीचं लग्न" अशा कारणांनी त्यांना येणं जमलं नाही.

एकदा जुई सांधेदुखीच्या आजाराने बिछान्याला खिळली. मी जयाला सुभाषकडे ठेवून महिनाभर तिच्या घरी राहून तिला मदत केली. मी अमेरिकेला परतण्याच्या वेळी जुई दोन आठवड्यांसाठी जाईकडे येऊन राहिली. तेव्हापासून सगळे आमची स्तुती करू लागले. "ह्या त्रिकुटाची मैत्री आगळीच" म्हणू लागले.

अमेरिकेत माझा व हेदरचा रुटूखुटू चाललेला धंदा हळूहळू तेजीत येऊ लागला. मग मी व हेदरने एका मोठ्या प्रसिद्ध नटाच्या घराचे इंटिरियर डेकोरेशन करण्याचं कॉंट्रॅक्ट मिळवलं. आणि आमची एकदम भरभराट झाली. मी व हेदर कामाच्या रगाड्यात अडकलो. घरांचं डेकोरेशन करण्यासाठी आम्हाला गावोगावी प्रवास करावा लागायचा. आम्ही एक सेक्रेटरी ठेवली व मदतनीस नेमली. "मी आता नोकरी सोडून घरी बसतो. तू खूप मिळवतेयस"असे विनोद सुभाष करू लागला. त्याचा, माझा व जयाचा प्रवास, ट्रेकिंग, स्किईंग, सायकलिंग ह्या सगळ्याला खीळ बसली. त्यात माझे वडील आजारी झाले. मी पुण्याला त्यांना भेटायला गेले तेव्हा जाई व जुई दोघी 'आता तू पूर्वीसारखी येत नाहीस' म्हणून तक्रार करू लागल्या. मी त्यांना म्हटलं, "तुम्हीच आता अमेरिकेला या." माझ्या आमंत्रणाला त्यांनीही 'येतो येतो' म्हणून आश्वासन दिलं.

पण त्यांच्या अडचणींमुळे त्या आल्या नाहीत. सासूचा आजार, मुलांच्या परीक्षा, सणवार अशा भानगडी त्यांच्यामागे होत्या. जुईच्या नवऱ्याला पत्नीशिवाय एकटं एकटं वाटायचं.

माझे व जाईजुईचे आईवडील एकएक करून येऊन गेले. जाईजुईच्या मुलामुलींची लग्नं झाली. जया मेडिकल कॉलेजमध्ये शिकत होती. सुभाष रिटायर होण्याची भाषा बोलू लागला. शेवटी मी जाईजुईवर आमंत्रणांचा वर्षाव केला. एव्हाना जाईचे गुडघे आणि जुईची पाठ त्यांना त्रास देत होती. जुईला धाप लागत होती. बऱ्याच प्रयत्नांनी त्या दोघींनी आपल्या घराची सोय केली आणि एका जूनमध्ये महिन्यासाठी माझ्या घरी

येण्याचा बेत केला. "मी तिकिट पाठवणार" असा हट्ट करून मी त्यांना तिकिटं पाठवली. "आता मी महिनाभर कुठेतरी नाहिसा होतो. मला लग्नात आंदण दिलेल्या तुझ्या दोघी मैत्रिणी येताहेत" असे विनोद सुभाष करू लागला.

मी त्यांची राजेशाही थाटात व्यवस्था केली. घरी स्वैपाकाला बाई ठेवली. त्यांना न्यूयॉर्क, वॉशिंग्टनला हिंडायला लिमोची व्यवस्था केली. उत्तम हॉटेलांत खोल्या घेतल्या.

त्या दोघींना एअर इंडियाचंच तिकीट हवं म्हणून मी तेच तिकीट काढलं होतं. 'जास्त सामान आणू नका. अमेरिकेत सगळं मिळतं' म्हणून सांगितलं. 'आत्ता हिवाळा नाही आहे. एक स्वेटर पुरे' अशीही सूचना दिली होती.

त्या दोघी विमानातून उतरल्या तेव्हा भरकटल्यासारख्या झाल्या होत्या. दमल्याही होत्या. मी किती नको नको म्हटलं तरी बरोबर लाडू, चिवडा, मसाल्याने भरलेल्या बॅगा घेऊन आल्या होत्या. न्यूयॉर्क एअर पोर्टवर आम्ही तिघी एकमेकींच्या गळ्यात पडलो आणि आमची, प्रामुख्याने जाईजुईची वटवट सुरू झाली. सुभाष मिस्किल हसत होता.

"किती इथल्या बायका सुंदर!"

"पुरुषसुद्धा! हँडसम."

"डोळ्यांचे रंग वेगवेगळे ... निळा, हिरवा, चॉकलेटी."

असं बोलत आम्ही कनेटिकटला घरी पोचलो. दोघी लगेच घरात हिंडू लागल्या. तोंडाची टकळी चालूच.

"हे तुझं घर का राजवाडा?"

"ही लिव्हिंगरूम केव्हढी मोठ्ठी! सिनेमा दाखवता येईल!"

"ह्या घरात मी वाट चुकणार!"

"तुम्हा दोघांना एव्हढं मोठ्ठं घर कशाला?"

"भोवती किती जागा! आंबे लाव ना!"

"अय्या, मला हरण दिसलं. सीतेच्या हरणासारखं सुंदर."

"आता दोन दिवस विश्रांती, मग भटकंती." त्यांची  टकळी थांबवत मी म्हटलं.

"उद्या मी तुझ्या अंगणात हरणं बघत हिंडणार. तेव्हढ्यानेच मी दमेन!" जुई म्हणाली.

त्या रात्री बडबडत आम्ही एका किंग साईझ बेडवर झोपलो. जाईजुई सकाळी लवकर उठून बसल्या. त्यांनी मलाही उठवलं. मी त्यांच्यासाठी चहा केला.

दोन दिवस विश्रांती झाली. न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, नायगारा आरामात पार पडलं. जयाला घरी यायला वेळ नव्हता म्हणून आम्हीच एक दिवस तिला बॉस्टनला भेटून आलो. डिसनीलाही धावती भेट दिली. आता एक आठवडा घरी आराम असं ठरलं होतं.

आमच्या गप्पात मी इंटिरियर डेकोरेटर म्हणून काय करते याची चर्चा झाली होती. परिणामी जाईच्या मनात माझ्या कामाबद्दल कुतूहल निर्माण झालं असावं. 'आता आठवडाभर आराम' असं मी म्हणताच जाई म्हणाली, "अजून एक इच्छा अपुरी राहिली आहे."

"ती कोणती?"

"तू सजवलेलं घर बघायचंय. अगदी खूप श्रीमंताचं!"

"बघते जमतं का!" मी म्हटलं आणि सेक्रेटरीला फोन केला. तिने माझा एक क्लाएंट शोधला. तो व त्याची पत्नी घरी नव्हते. त्यांनी मला त्यांचं घर दाखवायला परवानगी दिली. त्यांचं मोठ्ठं घर, इनडोअर,

आउटडोअर पूलस्, घराभोवतालची बाग, टेनिस कोर्ट, गेस्ट कॉटेजेस्, छोटी फळबाग व फुलबाग. हे सगळं बघून जाई व जुई चकित झाल्या.

घरी परतताना जुईने विचारलं, "ह्या लोकांकडे किती पैसे असतिल ग?"

"दोन तीन बिलियन!"

"एक बिलियन म्हणजे किती?"

"दहा हजार कोटी."

"हा आकडा ऐकून माझं डोकच भरभरायला लागलं." जाई म्हणाली.

आम्ही घर बघून परतताना जुई गप्प होती. आमचं जेवण आटोपल्यावर ती म्हणाली, "तुझं फारच कौतुक वाटतंय मला सायली. तू खूप पैसे कमावलेस. माझं बघ, मी आयुष्यात दमडीपण कमावली नाही."

जाई म्हणाली, "मी तरी कुठे काय कमावलं? शिक्षण, गाणं सगळं चुलीत घातलं."

"आपण आपल्या आयांपेक्षा काय वेगळं केलं, जाई?" जुई बोलली.

"तू निदान तुझ्या नवऱ्याच्या बदलीच्या नोकरीमुळे टिपटॉप रहायला शिकलीस. फॅशनेबल झालीस. तू अजून टेबलटेनिस, बॅटमिंटन खेळतेस. तुमची राहणी सुधारलेली आहे. तू फाडफाड इंग्लिश बोलतेस." जाई म्हणाली.

"सुधारलेली! अग, एका काळी ब्रिटिश वागत होते तसं वागण्याचा प्रयत्न करतोय आम्ही! अंधानुकरण आहे ते. सकाळी उठून लेफ्ट राइट करत ब्रेकफस्ट – टेबलावर बसतो आणि काट्याचमच्याने खातो. मी आर्मीत काय शिकले? मेकअप थापायला आणि फाडफाड इंग्लिश बोलायला! अग, लिटररी इंग्लिश लिहिता येतं का

मला? टेबलटेनिस, बॅटमिंटन खेळते, ते तर कुठेही खेळता येतं. मी फार काही केलं असं मला वाटत नाही. खरं सांगू, तुमचा दोघींचा हेवा वाटतो मला."

"माझा हेवा?" जाईचे डोळे मोट्ठे झाले. "अग, माझं आयुष्य सास्वा आणि सासऱ्यांची सेवा करण्यात, जुन्या पद्धतीने सण, सत्यनारायण साजरे करताना गेलं. किती वर्षे सोवळ्याने स्वैपाक करत होते मी! त्याचा तुला हेवा वाटतो?"

जुई म्हणाली, "तू जे करत होतीस ते आपलं होतं. ती आपली संस्कृती, धर्म होता. आमचं सगळं उसनं. भाषा उसनी, वागण्याची पद्धत उसनी असं मला वाटायचं. आता सायलीने बघ, स्वतःच्या हिमतीवर केवढा बिझिनेस उभा केला आहे. आपल्या दोघींसाठी किती पैसे खर्च केले. आपण कायम दुसऱ्याच्या जिवावर जगलो असं वाटतं मला."

जाई थोडा विचार करून म्हणाली, "पैशाच्या बाबतीत माझंही स्वतःविषयी तेच मत आहे. माझ्या पदरी माझी अशी दमडीही नाही हेच खरं!"

जाईजुई हेव्याच्या गप्पा मारताना ऐकून मला आश्चर्याचे धक्के बसत होते.

मी त्यांना म्हटलं, "जाई जुई, माझ्या यशासाठी आम्ही देशत्यागाची किंमत दिलीय. यशाला पोषक वातावरण या देशात आहे म्हणून मी यशस्वी झाले."

त्या दोघी गप्प बसून ऐकत होत्या. मी म्हटलं, "माझी आई माझ्या घराला 'लंकेतल्या सोन्याच्या विटांचं घर' म्हणायची." मग मी त्यांना विचारलं, "अग, तुम्ही घरकाम केलं त्याला काहीच किंमत नाही का? तुम्हाला मुलं झाली. ती तुम्ही वाढवली. त्याचं काय? सगळं पैशात मोजता येतं का? मला एकच मूल झालं. दुसरी जबाबदारी नाही. सुभाषची मदत म्हणून मी या उद्योगात पडले. माझ्या जागी तुम्ही असता तर तुम्हीही यशस्वी झाला असता. माझ्याकडे पैसे आहेत पण तुमच्याकडे माझ्यापेक्षा मोठ्ठी संपत्ती आहे."

"ती कुठली?" जाईजुईने एकदम विचारलं.

"मुलं, नातवंडं आहेत तुम्हाला. ती तुमची काळजी घेतील. एकमेकांना त्यांची मदत होईल. आमची जबाबदारी एकट्या जयावर आहे. तशी इथे असिस्टेड लिव्हिंग वगैरे आहेत पण शेवटी स्वतःचं असं माणूस लागतं. आमचं काय होईल ते होईल. पण जयाला कोण? अशी मला तिची काळजी वाटते....आणि एक सांगू? मला तुम्हा दोघींचा कायम हेवा वाटत आलाय."

"तो का?" जुईने विचारलं.

"तुम्ही दोघी गोऱ्या. तुमची लग्नं सहज जमली. जाई उत्तम गाते. जुई खेळाडू. मी काय केलं?

"खरं सांगू? मलाच तुझा हेवा वाटायचा." जुई म्हणाली, "तुझें लांब कुरळे केस कित्ती सुंदर होते! तुझे डोळे कसे हरणासारखे मोहक आहेत. शिवाय तू हुशार, नंबर नेहमी पहिला दुसरा. मी कित्ती अभ्यास केला तरी तिसाच्या वर माझा नंबर आलाच नाही. माझ्या बाबांची खूप इच्छा होती की मी किंवा माझ्या बहिणींपैकी एकीने डॉक्टर व्हावं. पण आम्हा दोघींची अक्कलच कमी पडली."

जाई म्हणाली, "आणि मला तुमचा दोघींचा हेवा वाटायचा. सायली अमेरिकेत मजा मारतेय, जुई मिलिटरीत हाय लाइफ जगतेय आणि मी सोवळ्याओवळ्याच्या रगाड्याला जुंपलेय असं मला वाटायचं. सायली जग बघतेय, जुई भारतभर हिंडतेय आणि मी मात्र पुणे एके पुणे करत बसलेय असंही वाटायचं."

"आपण ज्या काळात जन्माला येतो त्याचे व्हिक्टिम असतो." मी म्हटलं. आपलं लहानपण किती मजेत गेलं. आपल्याला कधी खाण्यापिण्याची ददात भासली नाही, शिक्षण मिळालं याचाच आपण आनंद मानून घेऊ."

जुई म्हणाली, "बरोबर आहे. "जगी सर्व सुखी असा कोण आहे. विचारे मना तूची शोधूनी पाहे."

तिने असा विचित्र सूर काढला की आम्ही तिघी हसू लागलो.

जुई म्हणाली, "चला, आपल्या मनातल्या हेव्यादाव्याचा निचरा होऊन गेला."

मी म्हटलं, "आत्तापर्यंत होती ९९ टक्के मैत्री आणि एक टक्का हेवेदावे. आता उरली १०० टक्के निखळ मैत्री. शुद्ध तुपासारखी."

"गणितज्ञ बोलले." जाई म्हणाली.

मी सांगितलं, "आता आपण भूतकाळ विसरू. भविष्याचे विचार डोक्यातून काढून टाकू आणि या क्षणासाठी जगू. कुणीतरी म्हटलंय,

"Yesterday is history

Tomorrow is mystery

Today is a gift

That's why it is called present."

"बरोब्बर" जुई म्हणाली. "हा सोनेरी क्षण आहे. आपण मज्जा करू." तिने धावत जाऊन फायरप्लेसवरचा हत्ती आणला. तो मधे मांडून ती म्हणाली, "आता आपण भोंडला करू,"

आम्ही तिघींनी हात धरून हत्तीभोवती फेर धरला. "ऐलमा पैलमा.... सुरू केलं. सुभाष वरून धावत खाली आला.

"तुम्ही भोंडला खेळताय! खरं सांगू? मी लहान होतो ना तेव्हा माझ्या बहिणीचा भोंडला असायचा. मलापण तेव्हा भोंडला खेळायची इच्छा होती. पण ती मला "चल्! मुलगे भोंडला खेळतात का?" असं म्हणून ढकलून घरात पाठवायची. मला तेव्हा सर्व मुलींचा एव्हढा हेवा वाटायचा!"

जुई म्हणाली, "मग ये. हा तुझा भोंडला खेळायचा चान्स."

त्याने हसत माझा व जुईचा हात धरला. "मी या वयात भोंडला खेळतोय यावर माझा विश्वास बसत नाही. एक सांगू का? मला पण भोंडल्याची गाणी येतात."

जाई म्हणाली, "बायकात पुरुष लांबोडा!"

मी आणि जुईने हसत फेऱ्या मारत भोंडला सुरू केला. "ऐलमा पैलमा गणेश देवा..."

पूर्वप्रसिद्धीः "अभिरुची" टॅम्पा बे, FL वार्षिक विशेषांक.